**पंतप्रधानांचे "सर्वांसाठी योग्य आणि न्यायपूर्ण भविष्य" वरील G20 सत्रात संबोधन (23 नोव्हेंबर 2025)**

23 नोव्हेंबर 2025

पंतप्रधानांनी आज "सर्वांसाठी योग्य आणि न्यायपूर्ण भविष्य - महत्त्वपूर्ण खनिजे; सन्मानजनक रोजगार; कृत्रिम बुद्धिमत्ता" वर G20 शिखर परिषदेच्या तिसऱ्या सत्राला संबोधित केले. महत्त्वाच्या तंत्रज्ञानांना प्रोत्साहन देण्याच्या पद्धतीत मूलभूत बदलासाठी पंतप्रधानांनी आवाहन केले. त्यांनी नमूद केले की असे तंत्रज्ञान ॲप्लिकेशन्स 'वित्त-केंद्रित' ऐवजी 'मानव-केंद्रित', 'राष्ट्रीय' ऐवजी 'जागतिक' आणि 'एक्सक्लुझिव्ह मॉडेल्स' ऐवजी 'ओपन सोर्स'वर आधारित असणे आवश्यक आहे. हे व्हिजन भारताच्या तंत्रज्ञान परिसंस्थेमध्ये समाकलित करण्यात आले आहे आणि त्यामुळे महत्त्वपूर्ण लाभ झाले आहेत, मग ते स्पेस ॲप्लिकेशन्स, AI किंवा डिजिटल पेमेंट्समध्ये असो जेथे ते जागतिक नेतृत्व आहे.

2. कृत्रिम बुद्धिमत्तेवर बोलताना, पंतप्रधानांनी समान प्रवेश, लोकसंख्या-स्तरीय कौशल्य आणि जबाबदार नियोजन यावर आधारित भारताच्या दृष्टीकोनाची रूपरेषा दिली. भारत--AI मिशन अंतर्गत, AI लाभ देशातील प्रत्येकापर्यंत पोहोचतील याची खात्री करण्याच्या उद्देशाने सुलभ उच्च-कार्यक्षमता संगणन क्षमता तयार केली जात आहे. पंतप्रधानांनी ठळकपणे सांगितले की AI ने जागतिक हितासाठी परिणाम साधले पाहिजे आणि त्यांनी पारदर्शकता, मानवी देखरेख, सुरक्षिततेच्या डिझाईनवर आधारित प्रणाली आणि गैरवापर प्रतिबंध याच्या तत्त्वांवर आधारित जागतिक कराराची मागणी केली. AI ने मानवी क्षमतांचा विस्तार केला पाहिजे, परंतु मानवांनी स्वतः अंतिम निर्णय घेतला पाहिजे यावर त्यांनी भर दिला. पंतप्रधान म्हणाले की भारत फेब्रुवारी 2026 मध्ये 'AI इम्पॅक्ट शिखर परिषद' आयोजित करणार असून याचा विषय असेल – 'सर्वजनं हिताय, सर्वजनं सुखाय' [सर्वांसाठी कल्याण, सर्वांसाठी आनंद]. त्यांनी या प्रयत्नात सहभागी होण्यासाठी सर्व G20 देशांना आमंत्रित केले.

3. पंतप्रधानांनी यावर भर दिला की AI च्या युगात आपल्याला 'आजच्या नोकऱ्या' वरून 'उद्याच्या क्षमतांकडे' आपला दृष्टिकोन वेगाने बदलण्याची गरज आहे. नवी दिल्ली G20 शिखर परिषदेत प्रतिभा गमनशीलतेवर झालेल्या प्रगतीचे स्मरण करून, त्यांनी प्रस्तावित केले की समूहाने आगामी वर्षांमध्ये प्रतिभा गमनशीलतेसाठी जागतिक फ्रेमवर्क विकसित केले पाहिजे.

4. पंतप्रधानांनी भारताचा संदेश आणि जागतिक कल्याणासाठीची बांधिलकी मांडत आपले भाषण समाप्त केले– भारत ज्या मूल्यांसाठी उभा आहे त्यावर भर देत: शाश्वत विकास, विश्वासार्ह व्यापार, न्याय्य वित्त व्यवस्था आणि असे प्रगतीमूलक भविष्य ज्यामध्ये प्रत्येकाचा समावेश होतो आणि सर्वांची भरभराट होते. पंतप्रधानांचे संपूर्ण भाषण येथे पाहता येईल [येथे].

जोहान्सबर्ग

23 नोव्हेंबर 2025